# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

**विषय :- कालबाह्य झालेल्या धनादेशाबाबत कार्यवाहीत बदल करणेबाबत...**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ अनुसार विद्यापीठाचे लेखे व्यापारी तत्वावर ठेवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने तसेच लेखा परिक्षण अहवालातील त्रुटीचे निराकरण करण्याच्या दृष्टीने कालबाह्य झालेल्या धनादेशासंबंधी कार्यवाहीत योग्य ते बदल करणे आवश्यक आहे. प्रचलीत पद्धतीनुसार ३ महिन्यानंतर धनादेश कालबाह्य झाल्यानंतर ज्या अर्थशिर्षामधून तो धनादेश काढला आहे त्या अर्थशिर्षाखाली तो जमा करण्यात येतो व तशा नोंदी लेख्यांमध्ये केल्या जातात.

प्रचलीत पद्धत व त्या अनुषंगाने यानंतर करावयाचे बदल याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. यापुढे तीन महिन्यांनंतर कालबाह्य झालेले धनादेश हे ज्या त्या खर्चाच्या अर्थशिर्षामध्ये जमा करुन न घेता खाली नमूद केल्याप्रमाणे जर्नल एन्ट्री करुन Current Liabilities या ग्रुप अंतर्गत **'Stale Cheque Liability A/c'** या अर्थशिर्षामध्ये (लेजर) जमा करुन घेण्यात यावेत.

Bank A/c Dr.
    To Stale Cheque Liability A/c

२. १ एप्रिल २०१७ पासून आजपर्यंतच्या कालावधीत कालबाह्य झालेल्या धनादेशाबाबत लेख्यांमध्ये जर्नल एन्ट्री केलेली असल्यास त्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) कालबाह्य धनादेशाची जर्नल एन्ट्री केल्यानंतर पुनश्च नवीन धनादेश काढलेला असेल तर याबाबत कोणतीही कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

ब) कालबाह्य धनादेशाची एन्ट्री केल्यानंतर नवीन धनादेश अदा केलेला नसल्यास अशा जर्नल एन्ट्रीमध्ये ज्या अर्थशिर्षाला जमा (Credit) दर्शविण्यात आलेले आहे त्या अर्थशिर्षाला नावे (Debit) टाकून **'Stale Cheque Liability A/c'** या अर्थशिर्षाला जमा (Credit) करण्यासाठी चालू तारखेस नवीन जर्नल एन्ट्री करण्यात यावी.

उदा. Maintenance, Repairs & Other Recurring Expenditure A/c Dr.
    To Stale Cheque Liability A/c

\\ADMIN7\d\d\AMOL GHODE\Gargote Madam\Paripatrak.doc

३. धनादेश कालबाह्य झाल्यानंतर ते **'Stale Cheque Liability A/c'** या अर्थशिर्षामध्ये जमा करण्यात आल्यानंतर संबंधित पार्टीला नव्याने धनादेश अदा करावयाचा झाल्यास तो **'Stale Cheque Liability A/c'** या अर्थशिर्षातूनच अदा करावा.

४. ज्याप्रमाणे प्रलंबीत उचल रकमांची यादी करण्यात येते त्याप्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्ष अखेरीस मुख्य वित्त विभागात ट्रायल बॅलन्स व इतर परिशिष्टाबरोबर सोबत जोडलेल्या तक्त्यात (**Enclosure No. 10)** नमूद केल्याप्रमाणे माहिती प्रतिवर्षी सादर करावी.

५. यासंदर्भात अधिक माहितीसाठी संबंधित सहा. वित्त अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

उपरोक्त बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

Gargote 12/1/18

**सीए. (डॉ.) विद्या गारगोटे**
**वित्त व लेखा अधिकारी**
अतिरिक्त कार्यभार

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
**जा.क्र. :** वित्त/२०१७-१८/1748
**दिनांक :** ०९/०१/२०१८

**सोबत :** वरील प्रमाणे.

**प्रति,**

१. सहा. वित्त अधिकारी.
२. केंद्रिय/विकेंद्रिय वित्त शाखाप्रमुख.

Enclosure No. 10

**Savitribai Phule Pune University**

**Name of the Department: ______________________________**

**Statement showing Stale Cheque Liability as on 31st March, ____________**

| Sr. No. | Name of the Party | Date of Payment | Date of Stale Cheque Journal Entry | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| TOTAL | | | | |

**Note :** Fresh Cheque issued against stale Cheque in the same Financial Year Should not be included in the statement. Total Figure should be tallied as per tally package.